क्र.मनपा/नसवि/२/विस/ ०२ /२०२०-२०२१
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- १३ / ०८ / २०२०

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका विशेष सभा क्रमांक - ०२ /२०२०-२०२१

## महानगरपालिका विशेष सभेची नोटीस (ऑनलाईन ॲपद्वारे)

प्रति,
मा..................................................................

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ड) (ह) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची विशेष सभा **मंगळवार दि.१८/०८/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता** पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह, मुख्यालय सांगली येथे **मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲपद्वारे आयोजित केली आहे.** या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी आपण सदर सभेस ऑनलाईन सहभागी व्हावे हि विनंती.

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. महापालिका क्षेत्रात कोरोना संक्रमित रुग्णाच्या उपचारासाठी महापालिकेच्या वतीने महापालिका स्वनिधीतून १०० ते २०० बेडचे डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) उभारणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१३/०८/२०२० चे विषयपत्र.**

२. महापालिकेच्या कोविड -१९ संबधीत कर्तव्य बजावताना मृत्यु होणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रत्येकी र.रु.१० लक्ष रक्कमेचे सानुग्रह सहाय्य देणेस व सदरचे सानुग्रह सहाय्य अदा करणेकरीता महापालिकेच्या सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पात लेखाशिर्ष निर्माण करुन, सदर लेखाशिर्षामध्ये रु.१ कोटीची तरतुद करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आस्थापि) यांचे दि.०५/०८/२०२० चे विषयपत्र.**

**मा.महापौरसो यांचे आदेशाने**

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

(टिप : मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन ॲपद्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रियेसंदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेजर यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.)

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- (विस) ०२** दिनांक :- १८/०८/२०२०

ठराव क्रमांक :- २४

विषय क्रमांक :- ०१

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१३/०८/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रात कोरोना संक्रमित रुग्णाच्या उपचारासाठी महापालिकेच्या वतीने महापालिका स्वनिधीतून तात्काळ १०० ते २०० बेडचे डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) उभारणेस मान्यता देणेकामी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव मोठ्या प्रमाणात दिसून येत असून, कोरोना रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. महापालिका क्षेत्रामधील खाजगी व शासकीय हॉस्पिटलमध्ये ऑक्सीजन बेडची संख्या अपुरी असल्यामुळे ऑक्सीजन बेड अभावी कोरोना रुग्णांचे मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. तसेच, रुग्णांना वेळेत ऑक्सीजन बेडची सुविधा उपलब्ध होत नसलेने, नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होत आहे. याबाबीचा विचार करुन, सदर विषाणूचा प्रार्दुभाव रोखणेसाठी व मनुष्यहानी रोखणेसाठी महापालिकेच्या वतीने ७ दिवसात ऑक्सीजन बेडची सुविधा असलेली डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) सर्वसाधारण १०० बेड व विशेष सुविधासह (ICU) २० बेड असे एकूण १२० बेडचे सेंटर सुरु करणेस ही सभा धोरणात्मक मान्यता देत आहे. या बेड संख्येमध्ये आवश्यकतेनुसार वाढ करण्यासही ही सभा मान्यता देत आहे.

सदर डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) सुरु करणेसाठी प्रशासनाने निश्चित केलेले सांगली कोल्हापूर रोड वरील महापालिकेच्या जकात नाक्या जवळील आदीसागर मंगल कार्यालय नाममात्र भाड्याने घेण्यास तसेच, सदर कार्यालयामध्ये हॉस्पिटल सुरु करणेच्या अनुषंगाने कराव्या लागणाऱ्या अनुषंगिक किरकोळ दुरुस्त्या, बांधकाम,पार्टीशन, टॉयलेट,बाथरुम इत्यादी तसेच विज, पाणी व स्वच्छता विषयक सुविधा याबाबत स्थायी समितीच्या मान्यतेने थेट कामगिरी करणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सदर डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) सुरु करणेसाठी प्रशासनाने आवश्यकतेनुसार डॉक्टर्स,फिजिशिएन, तज्ञ डॉक्टर, नर्सेस यासह आवश्यकत्तो पॅरामेडीकल स्टापची व इत्तर आवश्यक स्टाफची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करावी अथवा सदर सुविधा ऑऊट सोर्सिंग पद्धतीने प्राप्त करुन घेण्यास अथवा आवश्यक मनुष्यबळ थेट नियुक्ती करणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

... २ ...

सदर डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) सुरु करणेसाठी आवश्यकतेनुसार औषधे,वैद्यकिय उपकरणे,मशिनरी,व्हेंटीलेटर्स,ऑक्सीजन व ऑक्सीजन वाहिनी व इतर अनुषंगिक साहित्य थेट उत्पादक कंपन्यांकडून अथवा कंपन्यांचे अधिकृत वितरक यांचेकडून निगोशिएशनद्वारे कमीच्या दराने खरेदी करणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सदर डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) मध्ये ॲडमिट होणाऱ्या रुग्णांना जेवण,चहा-नाष्टा, यांची व्यवस्था तसेच, सदर सेंटर मध्ये सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविणे व रुग्णांचे नातेवाईक यांना रुग्णांशी व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे संपर्क साधणेसाठी सुविधा करणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सदर डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) साठी वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्था,दानशुर व्यक्ती,मंडळे, नागरिक,उद्योगपती,व्यापारी यांचेकडून रोख रक्कम अथवा साहित्य स्वरुपात वेगवेगळ्या प्रकारची मदत मिळत आहे. सदर मदत स्विकारणेस ही सभा आयुक्त यांना प्राधिकृत करत असून, आयुक्तांनी प्राप्त होणाऱ्या मदत निधीचा स्वतंत्रपणे हिशोब ठेवून, त्यामधून सेंटरला आवश्यक असणारे साहित्यासाठी खर्च करावा. तसेच, सदर सेंटरसाठी खरेदी करणेत येणारी तसेच, मदत स्वरुपात मिळणारे सर्व उपकरणे,साहित्य मशिनरी यांची स्वतंत्र नोंद रजिस्टर मध्ये नोंद घेवून, सदरचे सेंटर बंद झाल्यानंतर सदर सेंटरमधील सर्व उपकरणे,साहित्य मशिनरी हे महापालिकेच्या हॉस्पिटलमध्ये शिफ्ट करावे व त्याचा हॉस्पिटलसाठी वापर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

तसेच, महापालिकेच्या वतीने उभारणेत येत असलेल्या डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटर (DCHC) या सेंटरसाठी होणारा खर्च तसेच, कोविड-१९ च्या अनुषंगाने महापालिकेने केलेल्या CCC सेंटर, रॅपिड ॲन्टीजेन टेस्ट,कंत्राटी कर्मचारी वेतन यासह कोरोना प्रादुर्भाव रोखणेसाठी केलेल्या विविध उपाययोजनाकामी महापालिकेस झालेल्या व होणाऱ्या खर्चापोटी आवश्यक अनुदान मागणीचा प्रस्ताव तातडीने मा.शासनाकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत असून, सदर अनुदान मिळणेसाठी प्रशासनाने मा.शासनाकडे पाठपुरावा करावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा. संदिप आवटी — ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- N.G.Naik मा. नसिमा नाईक

महापौर,

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- (विस) ०२** दिनांक :- १८/०८/२०२०

ठराव क्रमांक :- २५

विषय क्रमांक :- ०२

सोबतचे उपायुक्त (आस्थावि) यांचे दि.०६/०८/२०२० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण -२०२०/प्र.क्र.०४ दि.२९ मे २०२० अन्वये कोविड-१९ शी संबधीत कर्तव्य बजावताना कोविडमुळे मृत्यु होणाऱ्या कर्मचाऱ्यांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य म्हणून ५० लक्ष सर्वकष व्यक्तीस अपघात विमा कवच पुरविण्यात येईल तसेच याबाबत विमा कंपनीशी चर्चा करुन विचार विनिमय करुन अंतीम करणेत येत असलेबाबत कळविलेले आहे. तसेच, सदर मा.शासन निर्णयातील ब)(५) या योजने सारखीच सानुग्रह सहाय्याची योजना सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व राज्य शासकीय सार्वजनिक उपक्रम यांचेकडून राबविण्यात येईल असे नमूद केले आहे. तसेच, शासन निर्णयानुसार महापालिकेकडून कार्यवाही करणेबाबत महापालिका कामगार युनियननी मागणी केलेली आहे.

सदर विषयाबाबत सभागृहामध्ये झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेकडील कोविड-१९ शी संबंधीत कर्तव्य बजावताना कोविडमुळे मुत्यू होणाऱ्या तसेच, ज्यांचेवर कोरोना संबंधीत कामकाजाची जबाबदारी नाही परंतु, महापालिकेचे दैनंदिन कार्यालयीन कामकाज पहात असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा कोरोना बाधित व्यक्तीशी संपर्क येत असतो त्यामुळे त्यांनाही कोविडची लागण होण्याशी शक्यता नाकारता येत नाही ही बाब लक्षात घेता, ज्यांचा कोविडमुळे मृत्यू होईल अशा महापालिकेतील सर्वच कायम,मानधन,बदली,रोजंदारी कर्मचारी यांना प्रत्येकी र.रु.१० लक्ष रक्कमेचे सानुग्रह सहाय्य देणेस व सदरचे सानुग्रह सहाय्य अदा करणेकरीता महापालिकेच्या सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पात नव्याने लेखाशिर्ष निर्माण करणेस व सदर लेखाशिर्षामध्ये र.रु.१ कोटीची तरतुद करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, महापालिकेतील कायम,मानधन,बदली,रोजंदारी या सर्वच कर्मचाऱ्यांचा विमा उतरविण्याबाबत विमा कंपन्यांशी चर्चा करुन, कर्मचाऱ्यांना जास्तीत-जास्त फायदा होईल अशा प्रकारे सर्वच कर्मचाऱ्यांचा विमा उतरविण्याबाबत प्रशासनाने योग्यती पुढील कार्यवाही ठेवावी असे ही सभा सूचित करीत आहे.

**महापालिका सचिव**
**सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका**

सूचक :- N.G.Naik मा. नगिना नाईक

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. संदिप आवटी

महापौर,